**MHPU180010412026**

भारतीय नागरी सुरक्षा संहितेच्या (२०२३ चा अधिनियम १२२) प्रकरण २३ अन्वये

संक्षिप्त संपरीक्षा केलेल्या खटल्याचा अभिलेख **(Plea)**

**श्रीमती एस. ए. विराणी, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे यांच्या न्यायालयात**

**सं.फौ.ख.क्र.५८९/२०२६**

नि.क्र.३

| | | |
|---|---|---|
| १. **गुन्हा घडल्याची तारीख** | : | दि.०६.०५.२०२६. |
| २. **अहवाल दाखल झाल्याची तारीख** | : | दि.०२.०६.२०२६. |
| ३. **तक्रारदाराचे नाव** | : | अर्जून पांडूरंग नरळे, पोलीस शिपाई, ब.क्र.२८८७, दौंड, पोलीस स्टेशन. |
| ४. **आरोपीचे नाव व पत्ता** | : | दादा मारुती जाधव , वयः– ३२ वर्षे, व्यवसायः– चालक, राहणारः–सिध्दटेक, ता. कर्जत, जि. अहिल्यानगर. |

५. **घटनेचा तपशीलः–** दि.०६.०५.२०२६ रोजी ११.३० वाजताचे सुमारास मौजे आंबेडकर चौक, दौंड, ता. दौंड, जि. पुणे गावचे हद्दीत एक चारचाकी इको गाडी क्र. एम. एच. ४२ के. ८९०७ हे वाहन सार्वजनिक रस्त्यावर येणारे जाणारे वाहनाना अटकाव होवुन लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा पध्दतीने उभी केल्याने, म्हणून तुम्ही भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वये शिक्षापात्र अपराध केला आहे.

SHABNAM ANSAR VIRANI

Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.06.06 13:10:13 +0530

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः– ०६.०६.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

## आरोपीचे निवेदन

प्रश्न क्र.१ तुम्हाला फिर्यादिच्या नकला मिळाल्या का ?

उत्तरः– होय

प्रश्न क्र.२ तुम्हाला आता जो आरोप मराठीत वाचून दाखविला व समजावून सांगितला तो तुम्हाला समजला काय ?

उत्तरः– होय

प्रश्न क्र.३ तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तरः– होय. मला गुन्हा कबूल आहे.

............................

(आरोपीची सही)

समक्ष

SHABNAM ANSAR VIRANI

Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.06.06 13:10:18 +0530

(एस. ए. विराणी)

दिनांकः– ०६.०६.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

## न्यायनिर्णय

आरोपी हा न्यायालयात हजर झाला. आरोपीने अर्ज नि.२ अन्वये सदर गुन्हा कबूल करत असल्याचे सांगितले. आरोपीस त्याचे विरुध्द ठेवण्यात आलेल्या दोषारोपासाठी असलेल्या शिक्षेबद्दल माहिती दिली. तसेच आरोपीस गुन्हा कबूल करणे बंधनकारक नाही व तो कबूल केल्यास गुन्ह्यास असलेली शिक्षा होवू शकते याबाबत सांगितले. त्यानंतरही आरोपी स्वतःचे गुन्हा कबूलीच्या निर्णयावर ठाम आहे. आरोपीने सदरचा गुन्हा कुणाच्याही दबावास बळी न पडता स्वेच्छेने कबूल करत असल्याचे सांगितले. त्यामुळे गुन्ह्याची कबूली स्वेच्छेने दिल्याची माझी खात्री झाली आहे. आरोपीने तो गरीब असून चालकाचे काम करून स्वतःचा उदरनिर्वाह करतो असे सांगितले. त्यामुळे कमीत कमी दंड करावा अशी विनंती केली. प्रस्तुत अपराधाचे वर्णन व परिस्थिती विचारात घेता खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

आरोपीस भारतीय न्याय संहिता कलम २८५ अन्वयेच्या अपराधासाठी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ नुसार दोषी ठरविण्यात येत असून रक्कम रूपये ५००/- (रक्कम रूपये पाचशे फक्त) इतका दंड ठोठावण्यात येत आहे व दंड न भरल्यास त्याने २ दिवस साधा कारावास सोसावा.

SHABNAM ANSAR VIRANI

Digitally signed by SHABNAM ANSAR VIRANI
Date: 2026.06.06 13:10:24 +0530

**(एस. ए. विराणी)**

दिनांकः- ०६.०६.२०२६. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, दौंड, जि. पुणे.

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file of judgment are same, word to word, as per original judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | S. A. Kanaki. |
| Name of the Court | : | Smt. S. A. Virani,<br>J.M.F.C., Daund, Dist. Pune. |
| Judgment date | : | 06.06.2026. |
| Judgment signed by the Presiding Officer on | : | 06.06.2026. |
| Judgment uploaded on | : | 06.06.2026. |